myresearchgo Volume 2, Issue 4, April 2026, ISSN: 3107-3816 (Online)

# लोनाड येथील शिलाहार-यादवकालीन शिवमंदिर परिसरातील शिल्पपट व विखुरलेल्या पुराअवशेषांचा अभ्यास

पंकज विजय समेळ
Independent Scholar
Founder, Purasanskriti
Email: pankajsamel.purasanskriti@gmail.com
Mobile: 9820254601

**गोषवारा**

कल्याण जवळील लोनाड येथील शिवमंदिर शिलाहार-यादवकालीन वास्तुकलेचा एक उत्कृष्ट नमुना आहे. १२व्या-१३व्या शतकात निर्माण झालेले हे मंदिर त्याच्या भिंतींवरील कोरीवकाम, नटराज, अंधकासुरवध, चामुंडा यांच्या प्रतिमा व गर्भगृह प्रवेशद्वाराच्या वर असलेल्या मातृका यांच्या चित्रणामुळे ऐतिहासिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. प्रस्तुत शोधनिबंध लोनाड मंदिराच्या भिंतींवरून गहाळ झालेल्या महत्त्वपूर्ण शिल्पपट्टिका (Sculpture Panels) आणि मंदिर परिसरात विखुरलेल्या सुट्या पुरावशेषांचा (Loose Sculptures) सद्यस्थितीचा आढावा घेतो.

अभ्यासातून असे दिसून येते की, नैसर्गिक झीज आणि मानवी हस्तक्षेपामुळे या मंदिरातील अनेक मौल्यवान शिल्पे गहाळ झाली आहेत किंवा चोरीला गेली आहेत. या शोधनिबंधात उपलब्ध छायाचित्रांच्या माध्यमातून गहाळ झालेल्या शिल्पांची ओळख पटवण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच, मंदिर परिसरात विखुरलेल्या देव-देवतांच्या मूर्ती, भारवाहक यक्ष, लज्जागौरी प्रतिमा व स्तंभांचे दस्तऐवजीकरण करणे हा या शोधनिबंधाचा मुख्य उद्देश आहे. लोनाडच्या या वारशाचे जतन आणि संवर्धन करण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्याची गरज हा प्रबंध अधोरेखित करतो.

**बीज शब्द**

लोनाड, शिलाहार-यादव राजवंश, मंदिरस्थापत्य, कल्याण, सांस्कृतिक वारसा संवर्धन

## लोनाड गावाची ऐतिहासिक पार्श्वभूमी

लोनाड गाव (१९.२९९०५३३,७३.१३२७२४७) ठाणे जिल्ह्यातील भिवंडी तालुक्यात आहे. टेकडीवरील बौद्ध लेणी व गावाच्या मध्यवर्ती भागात असलेल्या शिवमंदिरावरून ६वे शतक – १३वे शतक या काळात लोनाड ऐतिहासिक व धार्मिकदृष्ट्या महत्त्वाचे असल्याचे दिसून येते. बॉम्बे गॅझेटीअर खंड १४ मध्ये या लेण्यांची निर्मिती ६व्या-७व्या शतकात झाली असावी असे मत व्यक्त केले आहे. (Campbell 1882: 215) शिलाहारकालीन अभिलेखांमध्ये या गावाचा उल्लेख लवणेतट (मिराशी १९७७: ३६) व लोणवाटक (मिराशी १९७७: १५४) असा करण्यात आलेला आहे. भादान ताम्रपटात (मिराशी १९७७: ३६) लवणेतट नावाने या गावाचा उल्लेख पहिल्यांदा वाचायला मिळतो. लवणेतट किंवा लोणवाटक या नावांवरून येथे मोठ्या प्रमाणात मीठनिर्मिती किंवा मीठाचा व्यापार होत असावा असा प्राथमिक अंदाज आहे.

लोनाड गावाच्या मध्यवर्ती भागात शिलाहार-यादवकालीन (अंदाजे १२वे-१३वे शतक) शिवमंदिर आहे. ब्रिटीश अधिकारी डब्लू. एस. सिनक्लेअर यांच्या १८७५ साली प्रकाशित झालेल्या अहवालामध्ये पहिल्यांदा या मंदिराबद्दल माहिती वाचायला मिळते. सिनक्लेअर डोंगरावर असलेले लेणीवजा मंदिर बघण्यासाठी गावात आले तेव्हा त्यांच्या नजरेस हे मंदिर पडले. अंबरनाथ शिवमंदिराला भेट दिल्यानंतर लोनाड व अंबरनाथ मंदिराची शैली थोडीफार सारखी असल्याचे भाष्य सिनक्लेअर करतात. (Burgess 1875: 68) बॉम्बे प्रेसिडेंसी गॅझेटिअरमध्ये या मंदिराचा रामेश्वर मंदिर असा उल्लेख आहे. परंतु रामेश्वर या नावाबद्दल गॅझेटमध्ये काहीही संदर्भ दिलेला नाही. (Campbell 1882: 213) आज लोनाड येथील शिवमंदिराची ओळख रामेश्वर मंदिर अशी असली तरी या मंदिराची प्रथम नोंद करणाऱ्या सिनक्लेअर यांनी आपल्या अहवालात कोणत्याही नावाचा उल्लेख केलेला नाही ही उल्लेखनीय बाब आहे.

शिलाहारकालीन ताम्रपट व शिलालेखांमध्ये लोनाड गावात असलेल्या मंदिरांना दान दिल्याची माहिती आहे. शिलाहार राजा अपराजित याच्या राज्यकाळात भादान ताम्रपटात शक संवत ९१९ हेमलंब संवत्सर आषाढ कृष्ण चतुर्थी कर्कट संक्रांती किंवा दक्षिणायन पर्वणीस लवणेतट येथील लोणादित्य देवाची पूजा व देवालयाच्या जीर्णोद्धारासाठी भादान गाव दान दिल्याचे नमूद केले आहे. (मिराशी १९७७: ३६) लोणादित्य नावावरून येथे पूर्वी सूर्याचे मंदिर असल्याचे कळून येते. परंतु सद्यस्थितीत गावात सूर्यमंदिराचे अवशेष बघायला मिळत नाहीत.

myresearchgo Volume 2, Issue 4, April 2026, ISSN: 3107-3816 (Online)

शिलाहार राजा मल्लिकार्जुन याच्या वसई (शके १०८३ - सन ११६२) व द्वितीय अपरादित्य याच्या लोनाड (शके ११०६ - सन ११८४) या दोन्ही शिलालेखात लोनाड येथील शिवमंदिराबद्दल माहिती मिळते. मल्लिकार्जुन याच्या राज्यकाळातील शिलालेखात राजगुरु वेदशिव व भोपक व्योमशिव यांनी लोनाड येथील शिवमंदिराचा केलेला जिर्णोद्धार आणि इतर दानविषयक माहिती दिलेली आहे. त्याचबरोबर मंदिराच्या जीर्णोद्धार व विहिर खणल्याबद्दल अशा दोन कामांबद्दल लषण उपाध्याय याला लोणवाटक (लोनाड) हे गाव दान दिले होते. हे दान सूर्यपर्वणी असताना शके १०८३ वृष संवत्सर सोमवार पुष्य (पौष) अमावस्या रोजी दिले आहे. (मिराशी १९७७: १५३) द्वितीय अपरादित्य याच्या राज्यकाळात भोपक व्योमशंभूने शके ११०६ सोमवार क्रोधी संवत्सर कार्तिक अमावस्येला सूर्यग्रहणाच्या निमित्ताने व्योमेश्वरदेवाला (व्योमशंभूने स्वतःच्या नावाने बांधलेले शिवमंदिर) षट्षष्टि (साष्टी) विभागातील वेहरली गावातील काही जमीन आणि द्रव्य अर्पण केले. (मिराशी १९७७: १५६) मल्लिकार्जुनाच्या वसई शिलालेखात व्योमशंभूचा उल्लेख व्योमशिव असा केलेला आहे. वसई व लोनाड शिलालेखात ज्या मंदिराचा उल्लेख आलेला आहे, ते मंदिर म्हणजे सध्याचे रामेश्वर मंदिर असावे.

**मंदिर परिसरातील शिल्पपट व इतर पुरावशेष**

रामेश्वर मंदिर व आजूबाजूच्या परिसरात मुख्य मंदिराचा भाग असलेले शिल्पपट (आता गहाळ), मंदिर शिखराचे आमलक, स्तंभ, भारवाहक यक्ष, लज्जागौरी, मूर्तीचे पाय, भाविक(?) इ. पुरावशेष दुर्लक्षित अवस्थेत पडलेले नजरेस पडतात. या शोधनिबंधाच्या माध्यमातून शिल्पपट व पुरावशेषांची माहिती घेऊया.

**लज्जागौरी**

लज्जागौरी ही मातृदेवता आहे. भारतात इतिहासपूर्व काळापासून मातृदेवता उपासना होत होती. लज्जागौरी ही प्रजननाची देवता असल्यामुळे इंद्रियाच्या रूपातच तिची पूजा केली जाते. लज्जागौरीच्या मूर्तीमध्ये स्तनांना उभार देण्यासाठी हात बाजूला घेतलेले असतात व जननेंद्रियाला उठाव देण्यासाठी पाय गुडघ्यात दुमडलेले असतात.या देवतेच्या प्रतिमा कटीपर्यंतच्या भागाच्या किंवा स्कंधांपर्यंतच्या भागाच्या बनवलेल्या असतात. काहींमध्ये कमळशीर्ष असते तर काही शीर्षयुक्त असतात.

रामेश्वर मंदिराच्या समोर असलेल्या गावदेवी मंदिरात शेंदुर लावलेली लज्जागौरीची मूर्ती आहे. लज्जागौरी चतुर्भुज व शीर्षयुक्त आहे. जननेंद्रिय व स्तनांना उठाव येण्यासाठी पाय गुढघ्यात दुमडलेले आहेत. लज्जागौरीची मूर्ती १४” उंच आहे. लज्जागौरीची मूर्ती स्तंभशीर्षाचा भाग असावी असे तिच्या मागील हातांच्या ठेवणीवरून वाटते. पुढील दोन्ही हात पायांच्या जवळ ठेवलेले आहेत. मंदिर परिसरात पडलेल्या दोन शिल्पपटांमध्ये लज्जागौरी/उत्तानपाद स्त्रियांचे शिल्पांकन बघायला मिळते.

**भारवाहक यक्ष व इतर प्रतिमा**

गावदेवी मंदिराच्या बाहेर एक व हनुमान मंदिराच्या बाहेर दोन भारवाहक यक्षांच्या प्रतिमा आहेत. हे तिन्ही भारवाहक स्तंभशीर्ष म्हणून निर्माण करण्यात आलेले होते. यक्ष चतुर्भुज असून दोन हात पायावर व मागील दोन हात छताला आधार देत आहेत अशा पद्धतीने कोरलेले आहेत. यक्षांनी बाजूबंद, कंकण, कर्णकुंडले इ. विविध आभूषणे धारण केलेली आहेत. या सर्व यक्षांना शेंदूर लावलेला आहे. गावदेवी मंदिराच्या बाहेर चतुर्भुज देवतेची प्रतिमा आहे. पण मूर्तीला शेंदूर लावलेला असल्यामुळे तिची ओळख निश्चित करता येत नाही. देवतेने डावा हात डाव्या पायावर ठेवलेला आहे.

हनुमान मंदिराच्या बाहेर पद्मासन व ध्यान मुद्रेतील एक मूर्ती आहे. हि मूर्ती साधकाची असावी. मूर्तीला शेंदूर लावलेला असल्यामुळे अलंकार व इतर बारकाव्यांबद्दल ठोस माहिती देता येत नाही. साधकाच्या मूर्तीच्या शेजारी एका मूर्तीच्या पायाचे अवशेष ठेवलेले आहेत. हि मूर्ती अधिष्ठानावर समभंग अवस्थेत(?) आहे. या मूर्तीचे फक्त घोट्याखालील पाय दिसत असल्यामुळे सदर मूर्ती कोणत्या देवतेची आहे हे सांगत येत नाही. पायाच्या दोन्ही बाजूस सेवकसेविका असून डाव्या पायाजवळ असलेला सेवक नमस्कारमुद्रेत आहे.

**रामेश्वर मंदिरपरिसरात असलेले शिल्पपट**

मंदिराचा भाग असलेले चार शिल्पपट आवारात होते. या चारही शिल्पपटांवर देवता, साधक, सुरसुंदरी कोरलेल्या आहेत.

<u>शिल्पपट क्र. १</u>

हा शिल्पपट मंदिराच्या बाहेर असलेल्या मोकळ्या जागेत पडला होता. सद्यस्थितीत तो या जागेवर नाही. तीन कप्पे असलेला सदर शिल्पपट खंडित आहे. पहिल्या कप्प्यात त्रिभंग अवस्थेतील स्त्री प्रतिमा आहे. दुसऱ्या कप्प्यात सुखासनात बसलेली व आरशात बघणारी दर्पणा (आरशात आपले सौंदर्य न्याहाळणारी) प्रकारची सुरसुंदरी आहे. तिसऱ्या कप्प्यातील स्त्रीचे फक्त मस्तक व हात दिसत आहेत. या स्त्रीने केसांचा आंबाडा बांधला आहे. तिन्ही प्रतिमांनी विविध आभूषणे घातलेली आहेत.

<u>शिल्पपट क्र. २</u>

तीन कप्पे असलेला हा पट, शिल्पपट क्रमांक १ शेजारी पडलेला होता. या पटाच्या पहिल्या कप्प्यात स्त्रीवादक बासरी वाजवत आहे. दुसऱ्या कप्प्यात नृत्य आविर्भावात असलेली लज्जागौरी किंवा उत्तानपाद स्त्री व शेवटच्या कप्प्यात मृदुंगसदृश वाद्य वाजवणारे युगुल कोरलेले आहे. या तिन्ही कप्प्यातील प्रतिमा अलंकारित आहेत व स्त्रियांनी केसांचा आंबाडा बांधलेला आहे.

शिल्पपट क्र. ३

रामेश्वर मंदिराच्या सभामंडपातील उजव्या बाजूच्या गर्भगृहात हा शिल्पपट होता. काही महिन्यांपूर्वी मंदिरात बघायला मिळणारा हा शिल्पपट मंदिरात नाही. या शिल्पपटात तीन कप्पे आहेत. पहिल्या कप्प्यात शिवलिंगाला नमस्कार करणारा भाविक आहे. दुसऱ्या कप्प्यात असलेली पुरुष प्रतिमा कोणाची आहे हे ठोसपणे सांगता येत नाही. पुरुषप्रतिमा पद्मासनात बसलेली आहे. पुरुषाचा उजवा हात मांडीवर व डावा हात छातीजवळ आहे. शिल्पातील पुरुषाचे कान कर्णकुंडलांमुळे लांबवल्यासारखे दिसत असून डोक्यावर पागोट्यासारखे दिसणारे शिरस्त्राण घातलेले आहे. तिसऱ्या कप्प्यात असलेल्या लज्जागौरीचे मस्तक काळाच्या ओघात नष्ट झाले आहे. जननेंद्रिय व स्तनांना उठाव येण्यासाठी पाय गुढघ्यात दुमडलेले असून उजवा हात खांद्याला स्पर्श करत आहे व डावा हात मांडीवर ठेवलेला आहे.

शिल्पपट क्र. ४

रामेश्वर मंदिराच्या शेजारी असलेल्या मोकळया जागेत पाच कप्पे असलेला शिल्पपट दुर्लक्षित अवस्थेत पडलेला होता. नंतर अनेकदा या मंदिराला भेट देऊनसुद्धा हा शिल्पपट बघायला मिळाला नाही. या शिल्पपटातील पहिले दोन कप्पे तांत्रिक विधींशी निगडीत आहेत. पहिल्या कप्प्यात असलेल्या व्यक्तीने (phallus man) आपले लिंग दोन्ही हातांनी धरलेले आहे. दुसऱ्या कप्प्यात असलेल्या शिल्पात पुरुष गाढवाबरोबर अनैसर्गिक संभोग करत आहेत. तिसऱ्या कप्प्यात असलेली स्त्री त्रिभंगात उभी असून तिच्या पायाजवळ लहान बाळासारखी दिसणारी प्रतिमा आहे. चौथ्या कप्प्यात सुखासनात बसलेला चतुर्भुज डाव्या सोंडेचा गणपती आहे. गणपतीने हातात सुळा, परशु, अंकुश व लाडूची वाटी घेतलेलं आहे. पाचव्या कप्प्यात योगी असून त्याचा पायांभोवती योगपट्टा असून दोन्ही हात धरले आहेत. केसांचा आंबाडा बांधलेले असून दाढीमिशी शिल्पात दिसून येत आहे.

**मंदिराचे स्तंभ व आमलक**

मंदिराच्या मागे स्तंभांचे अवशेष दिसून येतात. परंतु काही वर्षांपूर्वी या स्तंभांच्या जवळ असलेला आमलक (मंदिर शिखरावर कळसाखाली असलेला गोलाकार भाग) गहाळ झालेला आहे.


**निष्कर्ष: गहाळ झालेले शिल्पपट महत्त्वाचे का आहेत?**

गहाळ झालेले शिल्पपट हे केवळ मंदिराचा एक भाग नव्हते. या शिल्पपटांमधून शिलाहार-यादव काळातील सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक, केशभूषा, वेषभूषा, वाद्ये आणि अलंकार यांची माहिती मिळते. परंतु या शिल्पपटांचे महत्त्व स्थानिकांना माहिती नसल्यामुळे कित्येक वर्ष दुर्लक्षित अवस्थेत होते व सद्यस्थितीत गहाळ झाले आहेत. गहाळ झालेले असल्यामुळे त्यांचा सखोल अभ्यास करणे शक्य नाही. तसेच गहाळ झालेल्या शिल्पपटांविषयी स्थानिकांशी विचारपूस केली तेव्हा त्यांना समाधानकारक उत्तरे देता आली नाहीत.


या शोधनिबंधात नमूद केलेल्या भारवाहक यक्ष व लज्जागौरी यांच्या दस्तऐवजीकरण्याच्या कामात आदर्श थोरात याने मदत केली आहे. गेल्या १०-१२ वर्षात रामेश्वर मंदिराला वेळावेळी दिलेल्या भेटीत शिल्पपटांचे व आमलकाचे फोटो घेतलेले आहेत.



छायाचित्र 1 - रामेश्वर मंदिर



छायाचित्र 2 - लज्जागौरी



छायाचित्र 3 - भारवाहक यक्ष



छायाचित्र 4 - अनामिक देवता



छायाचित्र 5 - आमलक

**myresearchgo Volume 2, Issue 4, April 2026, ISSN: 3107-3816 (Online)**



*छायाचित्र 6 - भारवाहक यक्ष व इतर प्रतिमा*



*छायाचित्र 7 - शिल्पपट १*



*छायाचित्र 8 - शिल्पपट २*

**myresearchgo Volume 2, Issue 4, April 2026, ISSN: 3107-3816 (Online)**



*छायाचित्र 9 - शिल्पपट ३*



*छायाचित्र 10 - शिल्पपट ४*

**संदर्भ**


1. Burgess, J. (Ed.). (1875). *Indian antiquary: A Journal of Oriental Research Vol.4*. Thacker, Vining & Co.
2. Campbell, J. (Ed.). (1882). *Gazetteer of the Bombay Presidency Volume XIV: Thana Places of Interest*. Government Central Press.
3. Mirashi, V. (Ed.). (1977). *Corpus Inscriptionum Indicarum Vol.6: Inscriptions of the Silaharas*. Archaeological Survey of India.